**विशेष दिवाणी दावा क्र. १८७/२०२३**

**रघुनाथ वि. रामचंद्र**

**<u>निशाणी ४४ खालील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने इसम नामे कांतिलाल भगवान मोरे यास प्रकरणात पक्षकार म्हणून सामील करुन घ्यावे तसेच दावा प्रलंबित असताना खरेदीखताच्या अनुषंगाने दुरुस्ती करण्यास परवानगी असावी, या मागणीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जकथन की, प्रस्तूतचा दावा हा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ याने इसम नामे कांतिलाल भगवान मोरे यास वादातीत मुखत्यारपत्राच्या आधारे दिनांक २८/१०/२०२५ रोजी वाद मिळकतीचे खरेदीखत अनाधिकाराने व बेकायदेशीररित्या नोंदविले असून सदर खरेदीखताच्या आधारे खरेदीदार इसम कांतिलाल भगवान मोरे याने वादीचे वाद मिळकतीवरील वहिवाटीस हरकत उपस्थित केली असल्याने वादीस प्रस्तूतचा अर्ज दाखल करणे भाग पडत आहे. तरी प्रस्तूतचा अर्ज मंजूर करुन अर्जात नमूदप्रमाणे इसमास पक्षकार करण्याची परवानगी मिळून त्याअनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी असावी, अशी मागणी वादीने केली आहे.

३. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादीकडून म्हणणे मांडून विरोध दर्शविण्यात आला आहे की, वादीचा अर्ज कायदेशीर नसून प्रकरणातील स्टेज पाहता तो या स्टेजला विचारात घेता येणार नाही. तरी फेटाळण्यात यावा, असे म्हणणे मांडलेले आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे विचारात घेतले. तसेच, दाव्यामध्ये निवाड्यासाठी विचाराधीन व समाविष्ठ असलेले मुद्दे विचारात घेवून दावा दाखल तारीख विचारात घेतली. तसेच खरा वादातीत मुद्दा विचारात घेता, वाद मिळकतीविषयी करण्यात आलेले कुलमुखत्यारपत्र व साठेखताचा लेख हा वादातीत असून ते आव्हानित करण्यात आलेले असून प्रस्तूत प्रकरणत प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ ने तिऱ्हाईत इसमानाच्या लाभात खरेदीखताचा लेख वाद मिळकतीसंदर्भात करुन दिलेला असून न्यायालयाकडून त्या संदर्भात कोणतीही पूर्व परवानगी घेतलेली दिसून येत नाही. प्रकरणातील वादातीत मुद्दे विचारात घेता, खरेदीदार इसमाना दाव्यात सामील करुन म्हणणे मांडण्याची संधी

असणे आवश्यक दिसून येत असून त्यातून प्रतिवादीचे न्यायहक्कावर कोणताही बाधा अर्जाचा विचार केला गेला तर दिसून येत नाही.

**५.** प्रकरणातील एकूण बाबी व परिस्थिती विचारात घेता, वादीचा अर्ज हा मंजूर होण्यास पात्र असा आहे, या निष्कर्षापर्यंत हे न्यायालय येत असून परिणामी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. वादीचा प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जात नमूदप्रमाणे दुरुस्ती घालण्यास व पक्षकार समाविष्ठ करण्यास वादीस परवानगी देण्यात येते.

KARADE RATILAL MACHINDRA

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2026.02.17 12:12:45 +0530

**(आर. एम. कराडे)**

दिनांक – १७/०२/२०२६ दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, माढा.